**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक २५८/२०१५ मधील</u>**
**<u>निशाणी ०५ खालील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता क्रम ३९ नियम १ नुसार प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे विरूध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) **<u>दावा विषय</u>:—** मौजे जेउर येथील कब्जा गट क्रमांक ८०/ब हददीतील सि.स.नं.६५० तसेच सि.स.नं.६४९ या मिळकती या दाव्याचा विषय असल्याने सदर मिळकतींना येथून पुढे <u>*दावा मिळकत*</u> असे संबोधण्यात येईल. सदर मिळकतींचे क्षेत्र तसेच चतु:सिमा दावा परिच्छेद क्र.१ येथे यथायोग्यरित्या नमुद केलेली आहे. तसेच दावा मिळकतीमधून असणा—या विवादीत रस्त्याला <u>*दावा रस्ता*</u> असे संबोधण्यात आले आहे.

**<u>वादीचे अर्जातील कथन संक्षिप्तपणे खालील प्रमाणे :—</u>**

३) सि.स.नं.६५० पुर्णत: तसेच सि.स.नं.६४९ मधील अर्धा हिस्सा वादीच्या मालकी व कब्जे वहिवाटीचा आहे. दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जित मिळकत आहे व सदर मिळकतीमध्ये येण्या—जाण्यासाठी वादीला पूर्व व उत्तरमुखी रस्ता आहे. प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या वहिवाटीचा रस्ता दक्षिणोत्तरमुखी आहे. वादीच्या पश्चिम बाजूला सि.स.नं. ६४९ मधील पश्चिमेकडील रस्त्यापर्यंतची जागा तसेच सि.स.नं.६५० ही घरजागा उत्तरमुखी रस्त्यापर्यंत आहे. सि.स.नं.६४९ हा वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या पूर्वजांनी पूर्वीपासून मोकळा ठेवला होता. असे असताना प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी उत्तर दिशेला शौचालय बांधून जाणे येण्यासाठी अडथळा निर्माण केला. सध्या प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्याकडे शारदा पांडुरंग सुतार ही रहात असून तिने दिनांक २३/०५/२०१५ रोजी गट विकास अधिकारी यांच्याकडे रस्त्याबाबतचा अर्ज दाखल केला. सदर शारदा सुतार हिला अर्ज देण्याचा कांहीही अधिकारी नसताना अथवा ती सि.स.नं.६५१ ची मालक नसताना तक्रारी

तिने अर्ज दिला आहे. सदर सि.स.नं.६५१ चे मालक म्हणजेच प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी कोणताही तक्रारी अर्ज दिलेला नाही. सदर प्रतिवादी क्र.४ व ५ तसेच वादी यांच्या पूर्वजांमध्ये सन १९८० रोजी तोंडी वाटप झाले असून त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ यांना उत्तरमुखी वहिवाट आहे. वादीची जागा उत्तर बाजुच्या रस्त्यापर्यंत चिकटून असल्याने प्रतिवादी क्र.४ व ५ यांना पूर्व बाजूला जायचे असल्यास वादीच्या घरातून जावे लागते. सदर रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता व नाही. प्रतिवादी क्र.४ व ५ यांना उत्तर व दक्षिण बाजूला रस्ता असताना वादीला त्रास देण्याच्या हेतूने खोटा अर्ज दिला. सदर अर्जावरून प्रतिवादी क्र.३ यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना रस्त्याबाबतची अडचण तात्काळ दुर करण्याचा व तसा अहवाल कार्यालयास सादर करण्याचा हुकूम केला आहे. सबब प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीच्या घरातून रस्ता दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सदर रस्त्याचा उल्लेख ग्रामपंचायत अभिलेखामध्ये नसताना बेकायदेशीरपणे जबाब देवून वादीला त्रास देण्यासाठी प्रतिवादी रस्ता मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. सबब वादींनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४) प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ व २ हजर झाले परंतु त्यांनी त्यांचे म्हणणे तसेच कैफियत आजपावेतो दाखल केलेली नाही. सबब प्रतिवादी क्र.१ व २ यांचे म्हणणे न्यायालयाच्या अवलोकनार्थ उपलब्ध नाही. तसेच प्रतिवादी क्र.४ व ५ यांना दाव्याच्या समन्सची योग्य बजावणी होवून देखील ते या कामी हजर झाले नाहीत. सबब त्यांचे विरूध्द एकतर्फा आदेश पारीत झाला.

५) सदर कामी प्रतिवादी क्र.३ याने हजर होवून त्याचे लेखी म्हणणे व कैफियत व निशाण क्र.२८ अन्वये दाखल केली आहे. सदर प्रतिवादी क्र.३ याने वादीचा दावा व अर्जामधील कथने फेटाळून लावली आहेत. तसेच वादीने दावा दाखल करण्यापूर्वी आवश्यक असणारी आगाउ नोटीस दिली नसल्याने सदरचा दावा रददबातल असल्याचे कथन केले आहे. तसेच ग्रामपंचायत, जेउर यांनी वादीला रस्त्याच्या अडथळयाबाबत कळविले असल्याने तसेच

प्रतिवादी क्र.३ याने संबंधितांचे जबाब घेवून व कागदपत्रे पाहून रस्त्याबाबतची अडचण दुर करण्याविषयी प्रतिवादी क्र.१ व २ यंना कळविले असल्याने वादीचा दावा रदद् होण्यास पात्र असल्याचे कथन केले आहे. सदर प्रतिवादी विरूध्द दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडले नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

६) वादी तर्फे श्री.एस.डी.होसमनी व प्रतिवादी क्र.३ करिता श्री.डी.एस.देवकर या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद व प्रकरणातील कागदोपत्री पुरावा विचारात घेवून खालील मुद्दे माझे समक्ष उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष त्यापूढे नोंदवून त्यावरील सविस्तर कारणमिमांसा मी खालील प्रमाणे देत आहे.

| | **मुददे** | | **उत्तर** |
|---|---|---|---|
| १) | वादीस सकृतदर्शनी कथन आहे का? | ... | नाही |
| २) | सोयीचे समतोलत्व वादीच्या बाजूने आहे का? | ... | नाही |
| ३) | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान संभवते का? | ... | नाही |
| ४) | काय आदेश? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**मुद्या क्र.१ ते ४ करिता**:—

७) वरील सर्व मुददे हे एकमेकांशी सलग्न व निगडीत असल्याने चर्चेची पुनरावृर्ती टाळण्यासाठी वरील प्रश्न एकत्रात विचारार्थ घेतले आहेत. वादीने त्याची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी दावा मिळकतीचे उतारे, दावा मिळकती तसेच अन्य मिळकतींचे शहर भूमापन नकाशे, ८अ चे उतारे, दिनांक ३०/०९/१९४० रोजी झालेल्या खरेदीखताची छायांकित प्रत, प्रतिवादी क्र.३ याला देण्यात आलेला तक्रारी अर्ज तसेच त्याने नोंदविलेले जबाब, प्रतिवादी

क्र.३ याने प्रतिवादी क्र.१ व २ यांना दिनांक १०/०९/२०१५ रोजी दिलेला आदेश, तसेच सदर आदेशावरून प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीला दिलेली नोटीस कामी पुराव्यादाखल सादर केली आहे. सदर कामी प्रतिवादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

८) सदर दाव्याचे स्वरूप पाहता, सदर दावा हा निरंतर ताकिदीचा आहे. सदर अर्जान्वये वादीने प्रतिवादींनी स्वत: अथवा इतरांमार्फत वादीच्या मिळकतीमधून रस्ता करू नये अशी तुर्तातुर्त मागणी केल्याचे दिसून येते. सदर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिलेल्या नोटीसीन्वये कारवाई करून वादीच्या घरातून रस्ता देवू नये अशा स्वरूपाची दाद वादीने मागितल्याचे आढळते. सदर कामी वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिनांक ११/०९/२०१५ रोजी दिलेली नोटीस आव्हानीत केलेली नाही अथवा तिच्या विरूध्द कोणत्याही आदेशाची याचना केलेली नाही. यावरून प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिलेली नोटीस वादीला मान्य असल्याचे प्रथन दर्शनी दिसून येते. प्रतिवादी क्र.१ हा शासनामार्फत नियुक्त अधिकारी असून प्रतिवादी क्र.२ हा ग्रामपंचायतीचा निर्वाचित सरपंच आहे.

९) सदर वादीने दावा मिळकतीचे वर्णन करीत असताना सि.स.नं.६४९ च्या चतु:सिमा दिल्याचे आढळते. वादीने दावा कलम २ मध्ये सि.स.नं.६४९ मधील अर्धा हिस्सा त्याच्या मालकी व कब्जे वहिवाटीचा असल्याचे नमुद केले आहे. सबब वादीने सि.स.नं.६४९ पैकी त्याच्या मालकीचे क्षेत्र व सदर क्षेत्राच्या चतु:सिमा दाव्यामध्ये स्पष्टपणे नमुद करणे गरजेचे होते. सदर चतु:सिमा व क्षेत्र अचूकपणे नमुद नसल्याने दावा मिळकतीच्या वर्णनाची व वादीच्या कब्जामधील क्षेत्राची अचूक माहिती देण्यास वादी प्रथमदर्शनी अपयशी झाल्याचे दिसून येते.

१०) सदर कामी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिलेली नोटीस ही त्यांच्या अधिकार कक्षेमध्ये व प्रतिवादी क्र.३ याने आदेशित केल्याप्रमाणे दिल्याचे प्रथम दर्शनी

दिसून येते. तसेच सदरच्या नोटीसीचा कायदेशीरपणा अथवा वैधता तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांची सदर नोटीस देण्यामागे असणारी अधिकार कक्षा वादीने सदर अर्जाव्दारे अथवा दाव्यातील मुळ कथनांव्दारे आव्हानीत केलेली नाही. सबब प्रथम दर्शनी सदरची नोटीस कायदेशीर असल्याबाबतचे कोणतेही कथन अथवा कागदोपत्री पुरावा या क्षणी अभिलेखावर उपलब्ध नाही.

११) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीला दिलेल्या नोटीसीचा कायदेशीरपणा आव्हानीत झाल्याखेरीज, प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्यांचे कर्तव्ये बजावण्यापासून रोखण्याचे कोणतेही प्रयोजन नाही. सबब वादी म्हणत असल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिनांक ११/०९/२०१५ रोजी दिलेल्या नोटीसीची पुर्तता करवून घेण्यापासून रोखणे या क्षणी योग्य ठरणार नाही.

१२) तात्पुरत्या मनाईचा हूकूम मिळविण्यासाठी वादीने सदर नोटीसीचा बेकायदेशीरपणा प्रथमदर्शनी न्यायालयासमोर आणणे आवश्यक होते. परंतु वादीने सदर नोटीसीबदद्ल व त्याच्या कायदेशीरपणाबदद्ल अवाक्षर काढलेले नाही. सबब प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिलेली नोटीस आव्हानीत झाली नसल्याने तसेच संदिग्ध चतु:सिमांमुळे वादी त्याचे कथन प्रथम दर्शनी शाबीत करू शकला नाही. तसेच न्यायाचा तौलनीक कल पाहता दाव्यातील नमुद चतु:सिमेप्रमाणे वादीस प्रतिवादी विरूध्द ताकिद दिल्यास वादी सदरहु आदेशाचा फायदा प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याकडील कारवाई विरूध्द वापरू शकतो ही बाब नाकारता येत नाही. सबब न्यायाचा तौलनिक कल वादीच्या बाजूने झुकत नाही व अपरिमीत नुकसानीची बाब देखील प्रथम दर्शनी वादीच्या बाजूने शाबीत होत नाही. सबब मुददा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुदद्ा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) अर्जाचा खर्च अंतिम खर्चाचा आकडा ठरवताना लक्षात घेतला जाईल.

**( महेश द.जोशी )**

दिनांक : २०/०९/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,करमाळा.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| (a) Name of the Stenographer | :- Gajanand L. Sutar |
| (b) Court | :- Jt. Civil Judge Jr. Div. & JMFC Court, Karmala |
| (c) Order signed by P.O.on | :- 20-09-2016 |
| (d) Order uploaded on | :- 20-09-2016 |